**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांचे हजेरीपटाच्या अनुषंगाने ग्रामसेवक/ग्राम रोजगार सेवक व यंत्रणेचे अधिकारी यांच्या कर्तव्ये जबाबदाऱ्यांबाबत मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन,**
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग),
शासन परिपत्रक क्रमांक:- मग्रारोहयो-२०१३/प्र.क्र.३५३/रोहयो१०-अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २३ ऑगस्ट, २०१३

वाचा:- (१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक- मग्रारो-२०११/प्र.क्र.४०/रोहयो-१०-अ, दि. २/५/२०११
(२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक- मग्रारो-२०११/प्र.क्र.४०/रोहयो-१०-अ, दि. ३०/८/२०११
(३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक- मग्रारो-२०११/प्र.क्र.४०/ रोहयो१०-अ, दि. १७/५/२०१२.

**शासन परिपत्रक**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ५०% रकमेची कामे ग्रामपंचायतीने करणे अनिवार्य असून योजनेचे पूर्ण नियोजन ग्रामपंचायतीने करावयाचे आहे. इतर यंत्रणांद्वारे कामे घेतली गेली तरी त्यासाठी ग्रामसभेची मान्यता घेणे व ग्रामपंचायतीची मंजुरी आवश्यक आहे. ग्रामपंचायतीचे सचिव ग्रामसेवक असून ते शासनाचे प्रतिनिधी आहेत. त्यामुळे योजनेच्या प्रभावी व काटेकोर अंमलबजावणीची जबाबदारी त्यांची आहे.

ग्रामसेवकाच्या मदतीसाठी बाह्यस्थ पध्दतीने ग्रामरोजगार सेवकाची नियुक्ती करण्यात येते. ग्राम रोजगार सेवक हे ग्रामसेवकाचे सहाय्यक आहेत. त्यांचे मानधन व इतर भत्ते ग्रामपंचायतीमार्फत आणि ग्रामसेवकाच्या शिफारशीनुसार देण्यात येत आहे. ग्राम रोजगार सेवकाची कर्तव्ये व जबाबदारी दि. २/५/२०११, ३०/८/२०११ व दि. १७ मे, २०१२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार हजेरीपत्रकाची प्राथमिक जबाबदारी ग्राम रोजगार सेवकाची राहिल आणि ग्रामपंचायतीअंतर्गत घेण्यात आलेल्या कामांसंदर्भात त्यावर

प्रतिस्वाक्षरी ग्रामसेवकाची असून यंत्रणेद्वारे घेण्यात येणा-या कामांच्या हजेरीपटांवर प्रतिस्वाक्षरी यंत्रणेचे तांत्रिक अधिकारी करतील असे आदेश देण्यात आलेले आहेत.

या संदर्भात ग्राम विकास विभाग यांच्या सोबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने ग्राम रोजगार सेवक व ग्राम सेवक यांच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वापरण्यात येणा-या हजेरीपत्रकाच्या अनुषंगाने कर्तव्ये व जबाबदाऱ्यांबाबत मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत:-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण राजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यात येणारी कामे दोन प्रकारची असतात:-

(१) सार्वजनिक कामे,
(२) वैयक्तिक लाभाची कामे

**सार्वजनिक कामे** :-

(१) ग्रामपंचायतीमध्ये प्रगतीपथावर असलेल्या सार्वजनिक कामांना ग्रामसेवक/यंत्रणेचे अधिकारी यांनी आठवड्यातून किमान एकदा भेट देऊन सदर कामाची तपासणी करणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर मजुरांची हजेरी घेणे व तेथे सोयी-सुविधा उपलब्ध आहेत किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.

(२) ग्राम रोजगार सेवकाने कामावर उपस्थित मजूरांची हजेरी बरोबर घेतली आहे किंवा नाही हे पाहाणे आवश्यक आहे. परंतु दैनंदिन हजेरी घेण्याची प्राथमिक जबाबदारी ग्राम रोजगार सेवकाची राहिल.

**वैयक्तिक लाभाची कामे** :-

शेतक-यांच्या वैयक्तिक जमिनींवर सिंचन सुविधा म्हणून विहीरी, शेततळी घेण्यात येतात. ही कामे विखुरलेल्या स्वरुपात असतात. या कामांवरील हजेरी घेण्याची जबाबदारी ग्राम रोजगार सेवकाची राहिल. ग्रामसेवकाने घेतलेल्या हजेरीची खात्री ग्रामसेवक किंवा यंत्रणेचे अधिकाऱ्याने करुन प्रतिस्वाक्षरी करावी.

**यंत्रणेद्वारे घेण्यात येणारी कामे** :-

यंत्रणेद्वारे घेण्यात येणा-या कामांची हजेरी सुध्दा ग्राम रोजगार सेवक घेतील आणि त्याचेवर प्रतिस्वाक्षरी विभागाचे तांत्रिक अधिकारी करतील. यंत्रणेच्या कामांसंदर्भात ग्रामसेवकांची प्रतिस्वाक्षरी आवश्यक नाही. परंतु सदर कामांना ग्रामसभेने मान्यता देऊन ग्रामपंचायतीने मंजुरी दिली असल्यामुळे ग्रामसेवकाने सदर कामांना ग्राम रोजगार सेवक भेट देऊन उपस्थिती ई-मस्टरमध्ये नोंदवीत आहेत किंवा नाही हे पाहाण्याची आवश्यकता आहे.

तेव्हा उपरोक्त बाबी विचारात घेऊन ग्रामरोजगार सेवकांनी स्वाक्षरी करताना खालील बाबी तपासण्याची त्यांच्यावर जबाबदारी राहील--

(१) ग्राम रोजगार सेवकाने मजुरीचे कामाची मागणी कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी यांना कळवून ई-मस्टर प्राप्त करुन घेतलेले आहे.

(२) ग्राम रोजगार सेवक सदर ई-मस्टर कामांच्या ठिकाणी नेऊन प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या मजुरांची हजेरी घेतलेली आहे.

(३) ग्राम रोजगार सेवक ग्रामपंचायत तथा यंत्रणेच्या कामामध्ये उपस्थित मजुरांची हजेरी घेण्यास जबाबदार आहे.

(४) ग्राम रोजगार सेवकांना प्रत्यक्ष स्थळ पाहाणी करुन मस्टरवर नोंदी घेतलेल्या आहेत.

(५) ग्राम रोजगार सेवकाने खात्री केलेली आहे की, ई-मस्टरवर नोंदविलेल्या मजुरांची नावे व प्रत्यक्ष उपस्थित असलेले मजूर एकच आहेत.

(६) सदर मजुरांकडे नरेगाचे जॉब कार्ड असून त्यांनी अगोदरच कामाची मागणी केलेली आहे.

(७) सदर मजूर हे संबंधित ग्रामपंचायतीतील आहेत किंवा जवळच्या ग्रामपंचायतीमधील मान्यताप्राप्त मजूर आहेत.

(८) सदर मजुरांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी सोयी-सवलती उपलब्ध आहेत.

(९) सदर कामांमध्ये मजूर विस्थापित करणा-या यंत्रांचा वापर करण्यात आलेला नाही.

(१०) कंत्राटदारांचा वापर होत नाही याची खात्री केली आहे.

(११) वैयक्तिक लाभाच्या कामांमध्ये (उदा.विहीर) कुशल कामे ग्रामपंचायतीमार्फत घेण्यात येत आहेत तसेच त्यासंबंधीत हजेरीपट लाभार्थ्यांकडे न ठेवता ग्रामपंचायतीमध्ये ठेवले आहेत.

**ग्राम सेवकांनी/यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी प्रतिस्वाक्षरी करताना त्यांचेवर खालील बाबी तपासण्याची जबाबदारी राहील:-**

(१) ग्राम रोजगार सेवकांनी प्रत्यक्ष कामांना भेटी दिल्या असून कामाच्या ठिकाणी मजुरांची उपस्थिती घेतलेली आहे.

(२) ग्राम रोजगार सेवक हे यंत्रणा व पंचायत समिती या दोघांच्या कामांवरील मजूर उपस्थिती घेतील. ग्रामपंचायतीमध्ये काम करणारे मजूर नरेगा अंतर्गत जॉब कार्डधारक असलेले मजूर असल्याची खात्री ग्रामसेवक करतील. तसेच यंत्रणेच्या कामांवरील मजूर नरेगा अंतर्गत जॉब कार्डधारक मजूर असल्याची खात्री यंत्रणेचे अधिकारी करतील.

(३) ग्राम सेवक हे ग्राम रोजगार सेवकाचे पर्यवेक्षकीय अधिकारी असल्यामुळे ग्राम रोजगार सेवक नियमितपणे ग्रामपंचायत कार्यालयात येत आहेत, कामांना भेटी देऊन मजुरांची उपस्थिती घेत आहेत याची खात्री करेल. तसेच ग्रामपंचायत व यंत्रणेच्या कामांवरील मजूर नरेगाअंतर्गत जॉब कार्डधारक असल्याची खात्री करावी.

(४) ग्राम रोजगार सेवक हे यंत्रणा व पंचायत समिती दोघांची मजूर उपस्थिती घेत आहेत आणि कामावर काम करणारे मजूर नरेगा अंतर्गत जॉब कार्डधारक असलेले मजूर आहेत.

(५) सदर मजूर यांनी अगोदरच कामाची मागणी केलेली आहे.

(६) ग्राम रोजगार सेवक ज्या दिवशी कामांना भेटी देईल त्या दिवशी ई-मस्टरप्रमाणे मजूर उपस्थित आहेत आणि बोगस उपस्थिती नाही याची खात्री करेल.

(७) ग्राम सेवक यांनी त्यांनी दिलेल्या भेटीच्या दरम्यानच ग्राम रोजगार सेवकांनी घेतलेली उपस्थितीची पडताळणी (cross check) करेल.

(८) सदर कामावर मजूर विस्थापित करणाऱ्या यंत्राचा वापर करण्यात आलेला नाही. तसेच कंत्राटदारांचाही वापर केला नाही.

(९) वैयक्तिक लाभाच्या कामांमध्ये (उदा.विहीर) कुशल कामे ग्रामपंचायतीमार्फत घेण्यात येत आहेत तसेच त्यासंबंधीत हजेरीपट लाभार्थ्यांकडे न ठेवता ग्रामपंचायतीमध्ये ठेवले आहेत.

वरीलप्रमाणे ग्राम रोजगार सेवक आणि ग्राम सेवकांनी फक्त मस्टरवर स्वाक्षरी करावयाची आहे, एम.बी.वर त्यांनी स्वाक्षरी करणे अपेक्षित नाही.

सदर परिपत्रक हे फक्त स्वाक्षरी व प्रतिस्वाक्षरी संदर्भात असून उपरोक्त उल्लेखित संदर्भाधिन शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे ग्राम रोजगार सेवक व ग्रामसेवकाची जबाबदारी व कर्तव्ये नियमितपणे पार पाडावीत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.govt.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्र.201308231429285716असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( आर. विमला )**
उप सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन

23/8/2013